# दि. ०९/०७/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे

## इतिवृत्त

दिनांक ०९.०७.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा.अध्यक्ष जि. प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

1. मा. श्री. प्रविणभाऊ देशमुख, अध्यक्ष जिल्हा परिषद यवतमाळ
2. मा. श्री. ययातीभाऊ नाईक उपाध्यक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ
3. मा. श्री. सुभाषभाऊ ठोकळ सभापती अर्थ व बांधकाम जि.प. यवतमाळ
4. मा. श्री. मनमोहनसिंग चव्हाण सभापती शिक्षण व आरोग्य जि.प. यवतमाळ
5. मा. श्री. प्रभाकरभाऊ उईके सभापती समाज कल्याण जि.प. यवतमाळ
6. सन्मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे सदस्य जिल्हा परिषद यवतमाळ
7. मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
8. मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ

**इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी**

१. श्री. अमित आडे उपकार्यकारी अभियंता ग्रा. पा.पु. वि. यवतमाळ
२. श्री. कैझर हुसैन सहा. भुवैज्ञानिक पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
३. श्री. के.एम. मानकर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ
४. श्री. अे.टी. पदमावार उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग पुसद
५. श्री. अ.वि. लोखंडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग दारव्हा
६. श्री. संजय येवले उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग पांढरकवडा
७. श्री. व्ही.बी. मिटकरी तंत्र अधिकारी जि.अ.कृ.अ. यवतमाळ
८. श्री. एच.एस. वाळके सहा. अभियंता राळेगाव
९. श्री. रामदास एस. सिरसाठ शा.अ. जि.ग्रा. वि.यं. यवतमाळ
१०. श्री. अ.ना. निसाळ सिंचन विभाग जि.प. यवतमाळ
११. श्री. पी.पी. देशपांडे उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
१२. श्री. नितीन शहाडे क.अ. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१३. श्री. पी. आर. कुरळकर क. अभियंता पा.पु.उपविभाग राळेगाव
१४. श्री. पी.एस. जैस्वाल उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग वणी
१५. श्री. एस.के. राठोड स.अ. महावितरण यवतमाळ

१६.श्री. अ.कि. कराळे महावितरण यवतमाळ
१७. कु. सोनाली शेंडे क.अ. पा.पु. विभाग यवतमाळ
१८. कु. वदना ढवळे निर्मल भारत अभियान यवतमाळ
१९. श्री. ए.एल. निमजे शा.अ. पाटबंधारे विभाग यवतमाळ
२०.श्री. टि.बी. पांडे वन विभाग यवतमाळ
२१. कु. ल.उ. वाकडे व.लि. य.म.प.विभाग यवतमाळ
२२. श्री. बी.डी. राठोड R.F.O. पांढरकवडा
२३. श्री. व्ही.एच. गावंडे म.जी.प्रा. विभाग यवतमाळ

*******

सर्व प्रथम अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरुवात केली.

त्यानंतर सर्व प्रथम मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री व पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचे प्रयत्नाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत १० % लोकवर्गणीची अट शिथील करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या करीता मा. अध्यक्ष यांनी सतत पाठपुरावा केला होता. त्याबद्दल शासनाचे सभागृहात अभिनंदन करुन धन्यवाद देण्यात आले.

**विषय क्र. १ :- दिनांक ११/०६/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्र. १ :- दिनांक ११.०६.२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास ही समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. २ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयाचा आढावा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने खालील प्रमाणे सादर केला.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव मधील शिवनाळा, खंडणी, मेंढणी, रोहपट येथील योजने वरील विद्युत जोडणी बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही अशी विचारणा केली असता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने सदर कामे इन्फ्रा २ मध्ये घेण्यात आली आहे,असे सांगीतले.यावर कार्यकारी अभियंता यांनी पुढील

कार्यवाही लवकरात लवकर केली तर पाणी पुरवठा बाबत कामे मार्गी लागतील असे सांगीतले. यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने या करीता ८ कोटी रुपये एवढा निधी पुर्ण सर्कलसाठी मंजुर झालेला आहे परंतु सर्व कार्यवाही पुर्ण होऊन निधी प्राप्त होणे करीता २ ते ३ महीणे लागतील असे सांगीतले. कामे टेंडर च्या कार्यवाहीत असल्याचे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी पाणी पुरवठा दुष्काळाची परिस्थीती लक्षात घेता सदर कामांना आचार संहिता सुरु होण्यापुर्वी टेंडर ची कार्यवाही पुर्ण करणे बाबत निर्देश दिले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मौ. चिखलगाव ता. वणी येथील बोअर वरील Yield बाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता. यावर मा. अध्यक्ष यांची कार्यकारी अभियंता व उपअभियांत यांचे सोबत झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी अंदाजपत्रकामध्ये तिन टयुबवेलचा वापर करुन व लोकसंख्ये प्रमाणे पाण्याच्या टाकीची क्षमतेची अंदाजपत्रकामध्ये तरतुद करावी व त्याप्रामणे अंदाजपत्रक विभागीय कार्यालयास सादर करावी. यावर का.अ पा.पु. यांनी उपअभियंता वणी यांना प्रस्ताव कधी सादर करणार या बाबत विचारणा केली असता उपअभियंता वणी यांनी ४ दिवसामध्ये सदर प्रस्ताव सादर करतो असे सांगीतले.

त्यांनंतर कार्यकारी अभियंता पा.पु. यांनी मौ. वाढोणा खुर्द येथील योजनेचे बाजुलाच इलेक्ट्रीक पोल आहे. त्यावरुन विद्युत जोडणी घेता येते परंतु सदर योजनेला अद्याप पर्यंत विद्युत जेडणी देण्यात आलेली नाही. योजनेचे काम पुर्ण झालेले आहे केवळ विद्युत जोडणी न मिळाल्यामुळे पाणी पुरवठा होऊ शकत नसल्याचे सांगीतले. यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने जर का.अ. पा.पु. इलेक्ट्रीक पोल करीता पैसे भरण्यास तयार असतील तर विद्युत जोडणी लगेच देता येईल असे सांगीतले.

त्यानंतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ यांनी मौ. मुरझडी लाल व मौ. मडकोणा ता. यवतमाळ येथील योजनेचे कामाला डिमांड मिळालेली नसल्याचे सांगीतले.

त्यानंतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग वणी यांनी मौ. शिबला ता. झरी व मौ. मेंढणी ता. मारेगाव येथील योजनेचे कामाला अद्याप डिमांड मिळालेली नसल्याचे सांगीतले.

त्यानंतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग दारव्हा यांनी मौ. बोरी (बु), माणकी, भुलाई येथील योजनेचे कामाला अद्याप डिमांड मिळालेली नसल्याचे सांगीतले.

यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी सदर योजनांना त्वरीत विद्युत जुळवणी देणे बाबत कार्यवाही करण्यात यावी.. तसेच होत असलेल्या अतिरीक्त विद्युत भार नियमना बाबत शेतक-यांची ओरड होत आहे. पावसाळा लांबला आहे, व विद्युत भार नियमनामुळे शेतीला पाणी देणे बाबत अडचणी येत आहे त्यामुळे अतिरीक्त विद्युत कपात करण्यात येऊ नये अश्या सुचना दिल्या.

**विषय क्र. ३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे प्रतिनिधीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा खालील प्रमाणे सादर केला.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे प्रतिनिधीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत सुरु असलेल्या महागाव येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम २,३ महीण्यात पुर्ण होते अशी खोटी माहीती सभागृहात सादर केली. सदर योजनेचे काम मागील ४ महीण्या पासुन बंद असुन सुध्दा कार्यकारी अभियंता यांचे कडून सभागृहात चुकीची माहीती सादर करण्यात आली. पाणी टंचाईचा काळ असुन सुध्दा सदर विभागा कडून सभागृहास टोलवाटोलवीचे व दिशाभुल करणारे उत्तरे देण्यात येतात यावरुन त्यांना या सभेचे गांभिर्य लक्षात येत नसल्या बाबत मा. अध्यक्ष व सर्व सन्मा. जि.प. सदस्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली.

त्यानंतर मारेगाव येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे उदभवाचे मुख्य शिर्षकामे, पुर्ण उर्ध्वनलीका,वितरण व्यवस्था किरकोळ कामांशिवाय पुर्ण, पंप प्राप्त व्हायचे आहेत. जलशुध्दीकरण केंद्र ६० टक्के पूर्ण, उंच टाकी ४२ टक्के पुर्ण व प्रगतीवर , योजनेवर जास्त खर्च होत असल्याने रु. ४९०.८७ लक्ष किंमतीचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर. राज्यस्तरीय समितीच्या दि. २९.०६.२०१२ रोजीचे बैठकीमध्ये प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारस केली आहे. त्यानंतर शासनाने वेळोवेळी उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता करण्यात आली असुन अंतिमता शेरेपुर्ती दि. ०५.०२.२०१४ रोजी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत कामे बंद आहे. सुधारीत योजना दि. ०९.०६.२०१४ रोजी मंजुरी प्राप्त अशी माहीती सादर केली. यावर मा अध्यक्ष यांनी काम कधी सुरु होईल अशी विचारणा केली असता, म.जी.प्रा. चे प्रतिनिधीने १५ दिवसात काम सुरु करण्यात येईल असे का.अ. पा.पु. यांनी सांगीतले.

त्यानंतर मौ. मुकुटबन ता. झरी येथील योजना ३१ मार्च २०१४ मध्ये कार्यान्वीत कामे प्रगतीपथावर सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी योजना दिनांक १७.०९.२०१२ रोजी शासनास सादर.मंजुरी अद्याप अप्राप्त असुन काम २ महीण्यामध्ये पुर्ण होते अशी माहीती दिली. यावर मा. अध्यक्ष यांनी पुढील प्रगती अहवाल सादर करणे बाबत निर्देश दिले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मुकुटबन ता. झरी व मारेगाव मधील संपुर्ण योजनेच्या कामाची माहीती द्या असे प्रतिनिधी म.जी.प्रा. यांना सांगीतले. यावर मा. अध्यक्ष यांनी पुढील सभेस का.अ. म.जी.प्रा. यांनीउपस्थित राहुन सविस्तर माहीती द्यावी असे निर्देश दिले.

त्यानंतर म.जी.प्रा. चे प्रतिनिधी यांनी बाभुळगाव पाणी पुरवठा योजनेचे जलशुध्दीकरण केंद्राचे काम ६० % पुर्ण, उर्ध्ववाहीनी करीता पाईप प्राप्त व काम प्रगतीपथावर असल्याचे सांगीतले. मौ. कोठा (वेणी) येथील योजनेच्या उंच टाकीचे काम स्टेजींग पर्यंत पुर्ण, उर्ध्ववाहनी करीता १५० एम.एम.डी.आय. के-९ प्राप्त , ७५ % काम पुर्ण , वितरण व्यवस्थेचे ७०% काम पुर्ण, योजनेचे काम सरासरी ६५ % पुर्ण झालेले आहे असे सांगीतले. यावर मा. अध्यक्ष यांनी पुढील सभेमध्ये कामाचा आढावा देणे बाबत सुचना दिल्या.

**विषय क्र. ४:- संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

सन २०१३-१४ मध्ये जिल्हयाला वैयक्तीक शौचालयाचे ५०५८८२ एवढे एकूण उद्दीष्ट आहे. त्यापैकी APL चे २७९८९४ व BPL चे २२५९८८ एवढे उद्दीष्ट आहे. माहे जुन २०१४ अखेर पर्यंत APL चे १२९५९९ एवढे बांधकाम झाले आहे, तर BPL चे ९३९८९असे एकूण २२३५८८ एवढे वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन एकूण ४४ % काम पुर्ण झाले असल्याची माहीती दिली.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी शौचालया करीता खोदण्यात आलेल्या खड्डयाचे पैसे अद्याप लोकांना मिळालेले नाही, त्यामुळे पुढील काम कसे करायचे या बाबत लोकांची ओरड होत आहे असल्याचे सांगीतले. यावर संपुर्ण स्वच्छता अभियान चे प्रतिनिधीने ८ ते १० दिवसांमध्ये सर्वांना खोदलेल्या शौचालय खड्डयाचे पैसे मिळतील असे सांगीतले.

**विषय क्र. ५ :- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा खालील प्रमाणे सादर केला.

१. प्रशासकीय मान्यता दिलेल्या विहीरींची संख्या - ७१०८
२. सुरु केलेल्या विहीरींची संख्या - ४६५२
३. पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या - १२९९
४. कामे सुरु असलेल्या विहीरींचा संख्या - ३१०
५. पुर्ण झालेल्या विहीरींवरील झालेला एकूण खर्च - २०६८.२३

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी पुर्ण झालेल्या विहीरींपैकी ६६७ विहीरींचे पेमेन्ट देण्यात आलेले नाही असे मागील सभेत सांगण्यात आले होते. या बाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली. यावर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने चे प्रतिनिधीने ६६७ विहीरी चावडी वाचना मध्ये आहेत असे सांगीतले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव मध्ये अश्या कीती विहीरी आहेत अशी विचारणा केली, यावर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने चे प्रतिनिधीने मारेगाव मध्ये एकूण १९ विहीरींची कामे पुर्ण झाली आहेत, व त्यांचे पेमेंन्ट देण्यात आले आहे. ५८ विहीरींची कामे सुरु आहे व त्यांचे पेमेन्ट देणे बाकी राहीलेले असल्याचे सांगीतले.

**विषय क्र. ६ :- पाणी पूरवठा विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत तालुका निहाय कामाची माहीती संबंधीत उपअभियंता यांनी खालील प्रमाणे सादर केली.

**सन २०१३-१४ वार्षिक कृती आराखड्यामधील उद्दीष्ठीत ९५ गांवे व बिगर उद्दीष्ठीत ८२ गांवाबाबत उपविभाग / तालुका निहाय माहितीचा गोषवारा**

| उपविभागाचे नांव | तालुका | २०१३-१४ (Target ) | | २०१३-१४ (Non Target) | | प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर प्राकलन | सुरू केलेली कामे | प्रस्तावित कामे | मंजुर कामे | |
| यवतमाळ | यवतमाळ | १६ | १६ | ५ | ४ | ३ |
| | आर्णी | १३ | १३ | ८ | ८ | ५ |
| | बाभुळगांव | ७ | ७ | ९ | ५ | ० |
| **एकुण** | | **३६** | **३६** | **२२** | **१७** | **८** |
| दारव्हा | दारव्हा | ९ | ९ | ७ | ६ | ३ |
| | नेर | ३ | ३ | १० | ९ | ५ |
| **एकुण** | | **१२** | **१२** | **१७** | **१५** | **८** |
| पांढरकवढा | पांढरकवडा | २ | २ | ३ | १ | ० |
| | घाटंजी | ११ | ११ | ४ | १ | १ |
| **एकुण** | | **१३** | **१३** | **७** | **२** | **१** |
| राळेगांव | राळेगांव | १ | १ | ९ | ८ | ३ |
| | कळंब | ९ | ९ | १३ | ७ | २ |
| **एकुण** | | **१०** | **१०** | **२२** | **१२** | **५** |
| पुसद | पुसद | २ | २ | १ | १ | ० |
| | दिग्रस | २ | २ | ४ | ४ | ३ |
| | उमरखेड | २ | २ | ० | ० | ० |
| | महागांव | ० | ० | २ | २ | ० |
| **एकुण** | | **६** | **६** | **७** | **६** | **३** |
| वणी | वणी | १ | १ | ४ | ० | ० |
| | मारेगांव | ११ | ११ | ३ | १ | ० |
| | झरी | ६ | १ | ० | ० | ० |
| **एकुण** | | **१८** | **१३** | **७** | **१** | **१** |
| **जिल्ह्याचे एकुण** | | ९५ | ९० | ८२ | ५३ | २६ |

---

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मौ. चिंचमंडळ ता. मारेगाव येथील नविन पाणी पुरवठा योजने करीता नविन उदभव घेणे आवश्यक असल्याने ग्राम सभा घेऊन

प्रश्न निकाली काढणे बाबत मागील सभेमध्ये सांगीतले होते त्या बाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली. यावर कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी तसे गटविकास अधिकारी यांना पत्र देण्यात आले असल्याचे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ११.०७.२०१४ रोजी प्रत्येक ग्राम पंचायत ला

ग्रामसभा होणार आहे, सदर सभेमध्ये वरिष्ठ भुवैज्ञानिक व उपअभियंता यांनी जाऊन ग्राम सभेमध्ये सदर विषय ठेऊन त्यास मान्यता घेणे बाबत निर्देश दिले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मौ. सावंगी ता. वणी येथील सोलरपंप आधारीत पाणी पुरवठयाचा प्रश्न निकाली काढणे बाबत कोणती कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली. सहा. भुवैज्ञानिक श्री. हुसैन यांनी सावंगी येथे हातपंपावर आधारीत योजना करणे शक्य होणार नाही. कारण त्या हातपंपाला आवश्यक तेवढी क्षमता मिळणार नाही. असे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी नदीवरुन ज्या प्रकारे जुनी योजना होती त्याच प्रकारे नविन योजना करण्यासाठी वरिष्ठ भुवैानिक च कार्यकारी अभियंता पा.पु. यांनी पाहणी करुन अहवाल सादर करावा. अंदाजपत्रकाची रक्कम दरडोई खर्चाच्या निकषापेक्षा जास्त होत असल्यास शासनाकडे पाठपुरावा करावा असे सांगीतले.

त्यानंतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग पुसद यांनी मौ. धनकेश्वर येथील लोकवर्गणी बाबत अडचण अद्याप ही दुर झालेली नाही असे सांगीतले. यावर मा. उपाध्यक्ष जि.प. यवतमाळ यांनी उपअभियंता पुसद यांना व गटविकास अधिकारी समिती पुसद यांनी योग्य कार्यवाही करणे बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी मौ. वाटखेड येथील योजनेच्या कामा बाबत विचारणा केली असता उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग राळेगाव यांचे प्रतिनिधीने वाटखेड येथे नविन समिती गठीत झाली आहे परंतु काम करण्यास तयार नाही, ग्रामपंचायत काम करण्यास तयार आहे व कोणतीही अडचण नसल्याचे सांगीतले. यावर मा. अध्यक्ष यांनी सदर योजनेच्या कामाची पाहणी स्वतः केली आहे. व उपअभियंता हयांनी पाटपुरावा करुन कामे त्वरीत पुर्ण करणे बाबत कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

त्यांनतर श्री. कैझर हूसैन सहा. भुवैज्ञानिक हे नियत वयोमानानुसार वयाचे ५८ वर्ष पुर्ण होऊन ते दिनांक ३१.०७.२०१४ रोजी सेवानिवृत्त होत आहे. त्यांचे सेवा काळात त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट सेवे बद्दल त्यांचे सभागृहात अभिनंदन करण्यात आले.

त्यांनतर मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाणी टंचाई परिस्थीतीवर मात करण्यासाठी करण्यात येणा-या विविध उपाययोजनां बाबत दिनांक ३ जुलै २०१४ च्या शासन निर्णयाचे वाचन केले.

**मा. अध्यक्ष, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**विषय क्र.७:- निर्मल भारत अभियान सन २०१४-१५ च्या AIP मान्यता मिळणे बाबत.**

सन २०१४-१५ च्या AIP नुसार २२१२.११ एवढी रक्कम खर्च करणे प्रस्तावित आहे. करीता वार्षीक कृती आराखडा व आईसी आराखडा मान्यता देण्यात येवुन आराखडा मंजुर करण्यात आला.

**विषय क्र.८:- मौजे मडकोना, ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस मंजुरी मिळणे बाबत.**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार मौ. मडकोना ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलन रु. ४५,६७,४००/- यांस प्रशासकीय मंजुरी प्राप्त करण्याचे दृष्टीने प्रस्ताव जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीपुढे ठेवण्यात येत आहे.

मौ. मडकोना ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे मुळ प्राकलन रु. ३९,७५,४००/- यांस कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यवतमाळ यांनी क्र. १७४ दिनांक ०८.०१.२०१३ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान आहे. मुळ योजनेस म.जी.प्रा. विभागाचे सन २०१०-११ चे दरसुचीनुसार दर घेण्यात आले आहे. सदर गाव आदिवासी क्षेत्रात येत असुन मुळ प्राकलन सर्वसामान्य दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आले होते. या योजनेचे कामा करीता पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत निविदा काढण्यात आल्या असता प्राप्त निविदा जास्त दराने प्राप्त झ ाल्यामुळे सदर कामाची निविदा जादा मंजुर करावी लागली. तसेच मा. कार्यकारी अभियंता जि.प.पा.पु. विभाग यवतमाळ यांनी भेटी दरम्यान दिलेल्या सुचने नुसार पाण्याच्या उंच टाकीची स्टजींग उंची १२ मी. ऐवजी ८ मी. करण्यात आलेलइ आहे. त्यामुळे योजना सन २०१२-१३ च्या दरसुची नुसार सुधारीत करण्याची आवश्यक भासली दरम्यानचे काळात सदर योजनेचे काम खोळंबुन राहू नये यास्तव योजनेचे पुरवठा विहीरीचे काम पाणी पुरवठा समिती मार्फत सुरु करण्यात आले आहे.

या योजनेसाठी सन २०१२-१३ चे म.जी.प्रा. विभागाचे प्रचलीत दरसुचीप्राणे दर वापरुन सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर सुधारीत प्राकलनाची रक्कम रु. ४५,६७,४००/- एवढी असुन मुळ मंजुर प्राकलनावरील वाढ १४.८९ % सुधारीत योजनेस कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यवतमाळ यांनी क्र. ३८ / १५७ दि. २०.०६.२०१४ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णया प्रमाणे स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी सुरु असतांना या योजनांमधील उदभव अयशस्वी ठरल्याने दुसरा उदभव घ्याव्या लागल्यास किंवा साहीत्याचे भाववाढीमुळे किंवा वीज कनेक्शन पोटी केलेल्या तरतुदीत वाढ झाल्यामुळे योजनांच्या किमतीत वाढ झाल्यास योजनांची किंमत मुळ किंमतीपेक्षा १५% पर्यंत वाढली तर अश्या स्वतंत्र / प्रादेशीक योजनांना मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता

समितीला आहेत. परंतु सदर्हु सुधारीत योजना प्रचलीत दरडोई खर्चाचे निकषात असणे अनिवार्य आहे. प्रस्तुत योजना प्रचलीत दरडोई खर्चाचे निकषात असेणे अनिवार्य आहे. प्रस्तुत योजना प्रचलीत दरडोई खर्चाचे निकषात असणे अनिवार्य आहे. प्रस्तुत योजना प्रचलीत दरडोई खर्चाचे निकषात म्हणजे दरडोई खर्च रु. २,३२७/- च्या तुलनेत रु. २,०५६/- एवढी असल्यामुळे बसत असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. २ :- मौजे मडकोना, ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस ही समिती मंजुरात प्रदान करते**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

शेवटी सर्व चर्चेनंतर उपस्थितांनी सभेचे कामकाजात दिलेल्या सहकार्या बाबत मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी हयांनी उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सदस्य सचिव**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**प्रविण देशमुख**
**अध्यक्ष**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**